# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ७७–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. बाबासो नामदेव साळुंखे,<br>मु. पो. देवनाळ, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय जत, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. बाबासो नामदेव साळुंखे, देवनार, जत यांना मुदतीत घरगुती वीज कनेक्शन न मिळाल्याने दिनांक दि. १९.१२.२००९ रोजी अंतर्गत कक्षात तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाचा निर्णय मान्य न झाल्याने दि. १८.३.२०१० रोजी ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर येथे तक्रार दाखल केली. मंचाने तक्रार दाखल करुन घेवून वि.प.कडून मुद्देनिहाय अहवाल मागविला. मुद्देनिहाय अहवाल प्राप्त झाल्यावर दि. ३.५.२०१० रोजी सुनावणीची तारीख नक्की केली व सुनावणी घेतली. सुनावणीच्यावेळी ग्राहक गैरहजर होते. वि.प.चे प्रतिनिधी उपस्थित होते.

दि. १८.३.२०१० रोजी तक्रार दाखल केल्यानंतर दि. १८.५.२०१० पर्यंत सुनावणी व निर्णय होणे अपेक्षित आहे तथापि १५ दिवसांचा विलंब न्यायनिर्णयास झाला आहे ही गोष्ट सत्य आहे.

ग्राहकाने दाखल केलेला अर्ज, सोबत रक्कम भरलेल्या पावत्या, वि.प.चा मुद्देनिहाय अभिप्राय, सुनावणी दरम्यानची कथने याचा एकत्रित विचार करुन मंच खालील निष्कर्षाप्रत आला आहे.

श्री. बाबासो नामदेव साळुंखे, देवनार, ता. जत यांनी नवीन घरगुती कनेक्शन मिळावे म्हणून दि. २४.३.२००८ रोजी रकमा जमा केल्याच्या पावत्या तक्रारीसोबत जोडल्या आहेत. तथापि चाचणी अहवाल जोडला आहे किंवा कसे याचा खुलासा ग्राहकाने आपल्या निवेदनात केलेला नाही. मात्र वीज पुरवठा झाला नाही म्हणून एस.ओ.पी. प्रमाणे भरपाई मिळावी व कनेक्शन मिळावे अशा मागण्या नोंदविल्या आहेत. वि.प.ने सुनावणीच्यावेळी कथन केल्याप्रमाणे तसेच मुद्देनिहाय अभिप्राय नोंदविल्याप्रमाणे ग्राहकाने दि. २४.३.२००८ रोजी रकमा भरल्या ही गोष्ट खरी आहे, तथापि चाचणी अहवाल दि. २०.४.२०१० रोजी दिला असल्याने विहित मुदतीत कनेक्शन देत असल्याचे कळविले आहे, याही बाबींचा मंचाने विचार केला.

दि. २४.३.२००८ रक्कम ग्राहकाने जमा केल्यावर त्यांस चाचणी अहवाल सादर करण्याबद्दल कंपनीने कळविले आहे किंवा कसे याचा खुलासा वि.प.च्या वतीने करण्यात आलेला नाही. तसेच ग्राहकानेही आपल्या अर्जात त्याबद्दल कोणताही उलगडा केलेला नाही. ग्राहकाने आपला तक्रार अर्ज पोष्टाने मंचामध्ये दाखल केला आहे. अर्जासोबत पावत्या व्यतिरिक्त कोणतेही निवेदन अथवा तपशिलवार माहिती दिलेली नाही तसेच दि. ३.५.२०१० रोजी सुनावणीस हजर राहता येत नसल्याबद्दलचा अर्ज मंचात फॅक्सने पाठविलेला आहे. त्यामध्ये पुढील तारीख द्यावी अशी विनंती केलेली आहे. तथापि मंचाकडील कामकाज याचा विचार करता, वि.प. अगर ग्रााहकाने वारंवार तारखा मागणे तरतुदीशी विसंगत असल्याने त्याचदिवशी दाखल कागदपत्रे व वि.प.चे म्हणणे या गोष्टींचा विचार करुन न्याय निर्णय केलेला आहे. सदर प्रकरणी वि.प.नेही आपल्या मुद्देनिहाय अभिप्रायात दि. २०.४.२०१० रोजी तपासणी अहवाल दिल्याचे व त्यानंतर मुदतीत कनेक्शन देत असल्याचे नमूद केले आहे. हे करीत असतांना सदरची जोडणी ही फक्त सर्व्हीस कनेक्शनची आहे की वाहिनी विस्तारावर आधारीत आहे याचा खुलासा केलेला नाही, कारण ह्या प्रकारच्या जोडणीसाठी विनियमात वेगवेगळया तरतुदी असल्याने वि.प. ने आपल्या अभिप्रायात नोंदविणे महत्वाचे होते, त्याकडे वि.प.चे दुर्लक्ष झाले आहे याची मंचाने नोंद घेतलेली आहे.

सबब अस्तित्वात असलेल्या जाळ्यातून जोडणी द्यावयाची आहे असे गृहीत धरुन रक्कम जमा केल्यानंतर म्हणजेच दि. २४.३.२००८ नंतर एक महिन्याचा कालावधी वजा करुन दि. २४.४.२००८ ते २०.४.२०१० या कार्यकाळाचा विचार विलंबासाठी भरपाई द्यावयाची झाल्यास करावा लागेल. ग्राहकाकडून वि.प.ने रक्कम जमा करुन घेतली आहे त्याअर्थी चाचणी अहवाल दाखल करा अशा आशयाची नोटीस वैंयक्तिक स्वरुपात वि.प.ने देणे आवश्यक होते या उपर ग्राहकाने सदर नोटीसीस दाद न दिल्यास ‘ पेड पेडींग लिस्टमधून ‘ ग्राहकाचे नांव कमी करुन त्यास भरलेली रक्कम परत देता आली असती यापैंकी कोणतीही उपाय योजना वि.प.ने केलेली नाही ही वस्तुस्थिती आहे, तसेच आपल्या दाखल कागदपत्रांतही त्याने तसे नोंदविले नाही. सर्व्हीस कनेक्शन अथवा वाहिनी विस्तार या बाबत विनियमात वेगवेगळया तरतुदी करतांना याची दक्षता घेतलेली आहे. कारण त्यासाठी लागणारा कार्यकालावधी हा कमी जास्त स्वरुपाचा असू शकतो इकडे पूर्ण लक्ष पुरविले आहे. तथपि वि.प. ने एस.ओ.पी.ला ‘ वाटाण्याचा अक्षता ‘ लावल्याचे दिसून येते, त्यामुळे वर नोंदविल्याप्रमाणे दि. २४.४.२००८ पासून दि. २०.४.२०१० पर्यंत १०४ आठवड्यांसाठी विलंबाच्या प्रति आठवड्यास किंवा त्याच्या भागास रु. १००/- या प्रमाणे रु. १०४००/- भरपाई रक्कम म्हणून ग्राहकाच्या मागणीप्रमाणे व तरतुदीप्रमाणे वि.प.ने ग्राहकास अदा करावी.

तसेच सर्व्हीस कनेक्शन गृहीत धरुन दि. २०.५.२०१० पर्यंत कनेक्शन द्यावे या दोन्हींचीही अंमलबजावणी केल्याचे मंचास विनियमातील तरतुदी प्रमाणे त्वरित कळवावे असा मंच आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) वर तपशिलांत नोंदविल्याप्रमाणे विलंबाच्या १०४ आठवड्यासाठी रु. १०४००/– इतकी भरपाई वि.प.ने ग्राहकास देण्याची आहे.

२) वीज जोडणी दिल्यानंतर देण्यात येणाऱ्या सलग दोन बिलींग सायकलमध्ये होणारी रकमेचे समायोजन करुन राहिलेली रक्कम चेकने ग्राहकास अदा करावी.

३) सदर प्रकरणी चाचणी अहवाल सादर करुन वीज जोडणी दिल्यानंतरच सदरची भरपाईची रक्कम देण्याची असल्याने वीज जोडणीचा अहवाल व त्यानंतर समायोजन केल्याचा अहवाल असे एकत्रित अंमलबजावणीचे अहवाल देण्यात यावेत त्यांस विनियमातील तरतुदीची बाधा येणार नाही.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक :

( जी. सी. लेले )
सदस्य

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष :

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :